नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०२/२०२५ (शुक्रवार)**

---

## नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे क्रिकेट सामना दरम्यान योग्य वाहतुक नियोजन

दिनांक ०६/०२/२०२५ रोजी भारत विरूध्द इंग्लंड यांच्यातील पहील्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामना दरम्यान नागपूर ग्रामीण पोलीस दलाने वाहतुकीचे सुयोग्य नियोजन केले. त्यामुळे यापुर्वी प्रत्येकदा सामना संपल्यानंतर स्टेडीयमच्या आजुबाजुच्या परिसरात मुख्य रस्त्यावर होणारी वाहतुकीची कोंडी टाळता आली व सर्वसामान्य नागरिकांना वाहतुकीचा नाहक त्रास सहन करावा लागला नाही. वाहतुक नियोजनाची पुर्वतयारीकरीता सकाळी ०८:०० वा. पासुन बंदोबस्त नेमण्यात आलेला होता.

बुट्टीबोरी उड्डाणपुल हा दि.२४/१२/२०२४ पासुन वाहतुकीसाठी बंद असल्याने त्या भागातील वाहतुक नियोजन अत्यंत महत्वाचे होते. नागपूर ग्रामीण पोलीस दलाने चंद्रपुर व वर्धा जिल्हयाकडुन येणारी जड व इतर वाहतुक तसेच सामना बघण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांच्या वाहनांचे योग्य नियोजन केल्याने संपुर्ण सामना कालावधी दरम्यान वाहतुक व्यवस्था सुरळीत होती. जिल्हा चंद्रपुरकडुन येणारी जड वाहतुक ही बुट्टीबोरी वाय पॉईंट व जिल्हा वर्धाकडुन येणारी जड वाहतुक ही ए.सी.सी. चौक या ठिकाणावरून वळविल्याने जामठा स्टेडीयमकडे जाणाऱ्या प्रेक्षकांना वाहतुक कोंडीचा सामना करावा लागला नाही. तसेच वाहतुकीसाठी बंद असलेल्या बुट्टीबोरी उड्डाणपुलाखाली सर्व वाहनांची वाहतुक सुरळीत सुरू होती. बाहेर गावातुन सामना बघण्यासाठी येणारे प्रेक्षकांना वळविलेली वाहतुक व पार्कींग व्यवस्था संबंधाने माहीती देण्याकरीता ठिकठिकाणी पोलीस अंमलदारांची नेमणुक करण्यात आली होती. या संपुर्ण बंदोबस्ताकरीता नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे सुसज्ज क्रेन, टोईंग वाहने, ॲम्ब्युलन्स या आवश्यक त्या सर्व ठिकाणी सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. आवश्यक त्या ठिकाणी बॅरीकेट्स लावुन वाहतुक वळविण्यात आली.

या महत्वाच्या बंदोबस्ताचे संपुर्ण नियोजन श्री.हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात करण्यात आले. बंदोबस्तामध्ये पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक, सहा.पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार व वाहतुक पोलीस अंमलदार यांना बंदोबस्तकामी नेमण्यात आलेले होते.




## क्रिकेट सट्टा / बेटिंग  लावुन जुगार खेळणाऱ्यांवर धाड  २ गुन्हे नोंद

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई


काल दिनांक ०६/०२/२०२५ रोजी नागपुर येथे सुरू असलेल्या भारत विरूध्द इंग्लंड एकदिवसीय क्रिकेटवर  सट्टा बेटींग लावुन जुगार खेळणाऱ्यांवर मा श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी ६४ संशयीत आरोपीतांना स्थानबध्द केले होते.तसेच क्रिकेट सट्टा/ बेटिंग करणाऱ्या आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.


**कारवाई क्र १)** काल दिनांक ०६/०२/२०२५ रोजी नागपुर येथे सुरू असलेल्या भारत विरूध्द इंग्लंड  एकदिवसीय क्रिकेट सट्टा बेटींग लावुन जुगार खेळणाऱ्यांवर श्री अनिल मस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर तथा सहा पोलीस अधीक्षक यांच्या पथकाने दि. ०६/०२/२५  रोजी धाड टाकली.  पोलीस ठाणे पारशीवनी हद्दीतील मौजा शिलादेवी गाव शिवारातील मंगेश खापेकर यांच्या फॉमहाऊस वर भारत विरूध्द  इंग्लंड' खेळणाऱ्या क्रिकेट सामनावर मोबाईल हॉटस्पॉट चा वापर करून, लॅपटॉप वर शुभ लाभ सॉफ्टवेअर ज्याची  आयडी ०२६५ व  ०४४८ तसेच अँड्रॉइड मोबाईल मध्ये FRZ 1 New या ॲप्लीकेशन आयडी चा वापर करून  पैश्याची हार, जीत चा  गेम खेळवणाऱ्या १) विशाल गजानन खापेकर वय ३६ रा.

वैशाली नगर नागपूर २) संकेत राजकुमार यादव वय ३०. रा , सदर नागपूर.३) गौरव राजेश श्रीवास वय २२, रा, नागपूर ४) गौरव दिगंबर टामने वय २९. र, नागपूर ५) इंद्रकुमार सिकंदर चौप वय २१, र, बिहार. यांना ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन १) ०४ नग लॅपटॉप एकूण की, २,००,०००/—रूपये २) २४ नग वेगवेगळी कंपनी चे अँड्रॉइड मोबाईल एकूण की. ५,००,०००/—रूपये असा एकूण ७,००,०००/— रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी नामे १) विशाल गजानन खापेकर वय ३६ रा. वैशाली नगर नागपूर २) संकेत राजकुमार यादव वय ३०. रा , सदर नागपूर.३) गौरव राजेश श्रीवास वय २२, रा, नागपूर ४) गौरव दिगंबर टामने वय २९. र, नागपूर ५) इंद्रकुमार सिकंदर चौप वय २१, र, बिहार. **पाहिजे आरोपी** ६) लोकेश खत्री रा. नागपूर यांच्या विरुद्ध कलम ११२, ४९ भान्यासं सहकलम ४,५ म.जू.का. अन्वये **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.






SHUBH LABH 0448
Configure
Create
Data Entry
Report
M REPORT
Agent
ABN+T
Modify
Delete
Refresh
Print
BOOK
Full Screen
Exit
( 5 ) IND / ENG 06/02/2025
IND ENG
NT 0 0
R 0 0
B 0 0
IND ENG
Agent 1
Agent 2
Amount Rate FV Mo Party Name IND ENG
24 50000 0.3200 IND L RAVI 16000 -50000
23 10000 0.3100 IND L NASIR 3100 -10000
22 10000 0.4500 IND L Z AGRAWAL 4500 -10000
21 5000 0.4800 IND L Z ASHOK 2400 -5000
20 25000 0.4800 IND L Z TIWARI 12000 -25000
19 200000 0.4500 IND L M66 90000 -200000
18 20000 0.6100 IND K Z TIWARI -12200 20000
17 10000 0.6400 IND L NASIR 6400 -10000
16 2000 0.7900 IND K PIMPLE -1580 2000
15 10000 0.7000 IND K Z AGRAWAL -7000 10000
14 10000 0.6800 IND K M JAY -6800 10000
13 10000 0.7000 IND K Z DHANRAJ -7000 10000
Amount Rate Item Mode Party Name 0
OK
S REPORT
New
Declare
Un Declare
Modify
Delete
Exit
Date Name Result Comm Type
06/02/2025 10 Declared YES

**कारवाई क्रं २**) दिनांक ०६/०२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की  पोलीस ठाणे खापा हद्दीतील कोथूरना येथे  क्रिकेट वर जुगार लावुन हारजीतचा खेळ खेळत जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पथक हे घटनास्थळी गेले असता त्यांना आरोपी—१) किसन जंगलुजी गावंडे वय ४० वर्षे रा. राजाजी वॉर्ड क्र ०३ कोथूरना ता. सावनेर हा भारत वि इंग्लंड सामन्यावर nice-24 fun वेबसाईट वर BS 12079 या आय डी वरून क्रिकेट सामन्याचा हारजीत चा जुगार खेळताना मिळून आल्याने त्याची सखोल विचारपुस केली असता पाहिजे आरोपी २) विनय वर्मा रा. काटोल ३) राजेश वर्मा रा. काटोल यांचा सुध्दा सहभाग असल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपी क्र १ च्या ताब्यातुन, एम आय कंपनी च्या मोबाईल किं. ८०००/— रु .व नगदी १०७० /— रू व  की  एकूण  ९०७०/— रू चा  मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन १)किशन जंगलुजी  गावंडे वय ४० रा कोथुळणा, २)विनय वर्मा वय ४० रा काटोल, ३)राजेश हरीचंद्र वर्मा रा काटोल ,यांच्यावर  **पोलीस ठाणे खापा** यांच्या  विरुद्ध कलम १२(अ) म. जू. का.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर